९७१
११/०४/२०२३

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां.१/ ५८५ /२०२३
दिनांक : ११ /०४/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

**(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)**

प्रस्तावना :

१. मौजे पर्वती येथील स.नं.८०,८१, सि.स.नं. २१९२/१ ते २१९२/१३, सहकारनगर, पर्वती, पुणे येथे टांगेवाला क्षेत्रातील ४२४७.१६ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१४/०६/२०२२ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. यासंदर्भात सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेल्या दि.०४/०७/२०२२ रोजीच्या अंतिम पात्रता यादीनुसार मिळकतीवरील एकूण झोपडीधारकांपैकी ७९.५० टक्के झोपडीधारकांनी विकसक मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स यांना संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/टांगेवाला/११४३/२०२१, दि. २२/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश अद्याप पारित करणेत आलेला नाही.

इ) झोपडीधारकांची दि.२०/०७/२०२२ रोजीची सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत केलेली अंतिम पात्रता यादी परिशिष्ट - २ करण्यात आली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.०१/०३/२०२३ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना माहितीसाठी बांधकाम करण्यात येणाऱ्या क्षेत्रावर दर्शनीय ठिकाणी डकवून उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

४. सदर प्रारुप योजनेसंदर्भात दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन या प्राधिकरणामार्फत दि. १०/०२/२०२३ रोजी सदर क्षेत्रासंबंधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेस उक्त नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

६. सदर योजनेद्वारे विकसक मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून तसेच सर्व सांविधानिक परवानग्यांच्या अधीन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ११ /०४/२०२३

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

11.4.23

(नीलेश ग. गटणे) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   -सक्षम प्राधिकारी क्र.१
   -सहा.निबंधक सहकारी संस्था - सदर प्रकरणी सह.संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   -संगणक शाखा - सदर आदेशास संकेत स्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी.
३. विकसक तथा जमीन भोगवटादार मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स
   सन माहू कॉम्प्लेक्स, पूना क्लब, ५ बंड गार्डन रोड, कॅम्प, पुणे-४११००१.
४. मौजे पर्वती येथील स.नं.८०,८१, सि.स.नं. २१९२/१ ते २१९२/१३, सहकारनगर, पर्वती, पुणे येथील टांगेवाला झोपडपट्टीवासीयांचे माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे